| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक : १.२.२०२४ | द्विघचा – २०२४ | वेळ : १ तास | A |
| इयत्ता : ९ वी | विषय : मराठी (L.L.) | गुण : २० | |

## विभाग – १ (गद्य विभाग)

**प्र.१) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) आकृती पूर्ण करा.** (२)

i) [ ] ← या नैसर्गिक आपत्तीमध्ये पक्ष्यांना अन्न मिळत नाही → [ ]

ii) १) गिर्यारोहकांच्या मागे जाणारे पक्षी → [ ]

२) पक्ष्यांच्या स्थलांतराची मूळ प्रेरणा → [ ]

पक्ष्यांच्या स्थलांतराचे अनेक प्रकार पाडता येतील. हिमालयासारख्या पर्वतरांगांमध्ये राहणारे पक्षी थंडीत खाली दरीत अथवा सखल भागात उतरतात आणि उन्हाळ्यात परत वर सरकतात. त्यांचा एकूण प्रवास काही किलोमीटरचाच असतो. अनेकदा दुष्काळ, महापूर अथवा बर्फवृष्टीमुळे एखाद्या प्रांतात अन्न मिळेनासे झाले की पक्षी तो प्रांत सोडून तात्पुरते दुसरीकडे जातात. मुळात अन्नाचे दुर्भिक्ष हीच स्थलांतरामागची मूळ प्रेरणा आहे. पक्ष्यांना थंडी वाऱ्याची फारशी काळजी नसते. अन्नाचा पुरेसा पुरवठा असेल तर पक्षी बर्फाळ प्रांतातही व्यवस्थित जगू शकतात. एरवी दोन ते पाच हजार मीटर उंचीपर्यंत सापडणारे हिमकाक पक्षी एव्हरेस्ट चढणाऱ्या गिर्यारोहकांच्या मागे मागे साडे आठ हजार मीटर म्हणजे सुमारे सत्तावीस हजार फुटांपर्यंत आल्याची नोंद आहे. एवढ्या उंचीवर या पक्ष्यांना बर्फ, थंडी आणि हवेची कमी होत जाणारी घनता याचा कोणत्याही प्रकारे त्रास होत असलेला दिसत नाही. हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात ते थंडीमुळे नाही तर बर्फ पडून अन्न शोधणे कठीण झाल्यामुळे.

**२) कारण लिहा.** (२)

i) हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात कारण –

ii) अन्नाचा पुरेसा पुरवठा असेल तर –

२) **खालील शब्दांसाठी उताऱ्यातील प्रतिशब्द शोधून लिहा.** (१)


१) खग =    २) हिम =

३) तुमच्या मते मानवी जीवन व पक्षी जीवन यांच्यातील महत्त्वाचे साधर्म्य सोदाहरण लिहा. (३)

## विभाग – २ पद्य

**प्र.२) खालील कविता वाचून सूचनेनुसार कृती करा.**

१) **शब्दजाल पूर्ण करा.** (२)




स्वागत करण्या वसंत ऋतूचे
रंग उधळले दिशा-दिशांना,
बेरड कोरड इथली सृष्टी
घेऊन आली ती नजराणा ।।१।।

गर्द पोपटी लेऊन वसने
मुरडत आली लिंबोणी,
जर्द तांबडी कर्णफुलेही
घालून सजली नागफणी ।।२।।

लुसलुस पाने अंगोपांगी
झुले वड हा दंग होऊनी
दुरंगी चुनरीत उभी ही,
घाणेरी ही नटुनी थटुनी ।।३।।

सळसळ झळझळ पिंपळ पाने
मऊ मुलायम मोरपिसापरी,
सांबर लाल कळयांनी लखडून
उभे स्वाता पाणंदीवरी ।।४।।

पळसफुले ही बहरुन आली
या मातीच्या अंकावरती,
कुसुमे सारी या जगातली
पाहुन त्यांना मनात झुरती ।।५।।

आंब्याच्या मोहरातून आली
कोकिळेची सुरेल तान,
उजाड उघडे माळरानही,
गाऊ लागले वसंतगान ।।६।।

इयत्ता : ९ वी विषय : मराठी (LL) (3) **A**

२i) **चौकट पूर्ण करा.** (१)

i) आगमनापूर्वी माळरानाची स्थिती → [ ]

ii) मातीच्या मांडीवर फुललेली → [ ]

ii) **पुढील घटक वसंतऋतूच्या आगमनाने कसे सजले ते लिहा.** (१)

i) नागफणी – [ ] ii) घाणेरी – [ ]

३) **खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.** (२)

स्वागत करण्या वसंत ऋतूचे
रंग उधळले दिशा – दिशांना
बेरड कोरड इथली सृष्टी
घेऊन आली ती नजराणा

## विभाग – ३ स्थूलवाचन

प्र.३) **पुढीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** (२)

१) **टिप लिहा.**

१) व्हेनिस म्हणजे निरुद्योगी शहर

२) व्हेनिसच्या स्टेशन बाहेरचा परिसर

## विभाग – ४ व्याकरण

१) **पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** (२)

i) गायब होणे ii) घुस्सा होणे

२) **वचन बदला.** (१)

i) किल्ली ii) डोळे -

३) **पुढील गटातील अचूक शब्द ओळखा.** (१)

१) आशिर्वाद, अशीर्वाद, आर्शीवार्द

२) कीर्ती, किर्ती, कीर्ति , किर्ति